<u>कुलाबा-वांद्रे-सीप्झ मुंबई मेट्रो-३ मार्ग</u>

# मेट्रो-३ प्रवासादरम्यान मिळणार अखंडीत मोबाईल सेवा

**मुंबई, ५ मार्च, २०२४ -** मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन (मुं.मे.रे.कॉ.) ने सौदी अरेबियामधील रियाध शहरात स्थित असलेल्या एसीईएस (ACES) या कंपनीच्या इंडिया प्रायव्हेट लिमिटेड या उपकंपनीसोबत मेट्रो मार्ग-३ करता दूरसंचार पायाभूत सुविधा प्रदान करण्याच्या करारावर स्वाक्षरी केली. ४ मार्च, २०२४ रोजी सौदी अरेबियातील रियाध शहरात आयोजित LEAP-२०२४ कार्यक्रमांतर्गत - "A Digital DAVOS" समारंभात या करारावर स्वाक्षरी करण्यात आली.

यावेळी मुं.मे.रे.कॉ. च्या व्यवस्थापकीय संचालक श्रीमती. अश्विनी भिडे, संचालक (नियोजन आणि रिअल इस्टेट डेव्हलपमेंट/ NFBR) श्री. आर. रमणा, संप्रेषण आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालय विभागातील दूरसंचार आणि पायाभूत सुविधांचे उपमंत्री (MCIT)(इंजि.) बस्सम ए. अल-बस्सम, एसीईएसचे मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) श्री. डॉ. अक्रम अबुरस, मुख्य तंत्रज्ञान अधिकारी (सीटीओ) श्री. डॉ. खालिद अलमाशौक, एसीईएस इंडिया प्रायव्हेट लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक श्री. मोहम्मद मजहर तसेच श्री. अमित शर्मा, सौदी एक्झिम बँकेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्री. डॉ. नईफ अल शम्मारी, भारतीय दूतावास यांच्यावतीने मिशन उपप्रमुख श्री. अबू माथेन जॉर्ज आणि समुपदेशक श्रीमती. मनुस्मृती आदी मान्यवरांसह मुं.मे.रे.कॉ. व एसीईएसमधील इतर प्रमुख सदस्य उपस्थित होते.

“मुंबई मेट्रो मार्ग-३ करता दूरसंचार पायाभूत सुविधा प्रदान करण्यासाठी एसीईएस इंडिया कंपनीसोबत करार करताना आम्हाला आनंद होत आहे. यामुळे आता मेट्रो-३ च्या प्रवासादरम्यान अखंडित मोबाईल आणि इंटरनेट सेवा उलब्ध होईल. एसीईएस ही जागतिक पातळीवरील अनुभव असलेली आघाडीची आंतरराष्ट्रीय न्युट्रल डिजिटल इन्फ्रास्ट्रक्चर कंपनी आहे. मेट्रो-३ च्या दरवर्षी ६२५ दशलक्षाहून अधिक प्रवाशांना डिजिटल अनुभव देण्यासाठीची ही भागीदारी महत्त्वपूर्ण ठरेल”, असे मत मुं.मे.रे.कॉ. च्या व्यवस्थापकीय संचालक श्रीमती. अश्विनी भिडे यांनी व्यक्त केले.

साधारण १२ वर्षांसाठी करण्यात आलेल्या या करारामुळे ४जी व ५जी सारख्या अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करत मेट्रो-३ द्वारे प्रवास करणाऱ्या प्रवाशांना त्यांच्या ३३.५ कि.मी. लांबीच्या प्रवासादरम्यान संपूर्ण २७ स्थानकांवर, प्लॅटफॉर्मवर, भुयाऱ्यांमध्ये अतिजलद व अखंडीत मोबाईल सेवा प्राप्त होणार आहे. (समाप्त)

**For further information please contact :-**

**Vaidehi Khadse/DGM (PR)**
**9028543087**
**vaidehi.more@mmrcl.com**

**Niti Tamse/AM (PR)**
**8369727364**
**niti.tamse@mmrcl.com**